## व्यापार विश्व

# कॅपिटल हाइट्सचा प्रारंभ



पत्रकार परिषदेत माहिती देताना माहेश्वरी, सौरभ जैन.

नागपूर, ता. २४ : रिअल इस्टेट क्षेत्रातील टाटा रिॲलिटी ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चरने नागपुरात कॅपिटल हाइट्स या ७ स्टार क्रिसील रेटिंग प्रीमिअर रेसिडेन्स हाउसेसचा नुकताच शुभारंभ केला. यासोबतच टाटाच्या सर्व सुविधांनी सज्ज ट्रिलियम मॉलची घोषणा केली. टाटा रिॲलिटी ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चरचा नागपुरातील पहिलाच प्रकल्प आहे. या माध्यमातून नागरिकांना सुरक्षितपणे व विश्वासाने गुंतवणूक करण्याचा पर्याय उपलब्ध झाला आहे, अशी माहिती टाटा रिॲलिटी ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चरचे रिअल इस्टेट हेड अभिजित माहेश्वरी यांनी पत्रकार परिषदेत दिली. मॉलमध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे दुकाने व ब्रॅंडेड वस्तू उपलब्ध होतील, असेही अभिजित माहेश्वरी यांनी सांगितले. पत्रकार परिषदेत कॅपिटल हाइट्सचे सिनिअर मॅनेजर सौरभ जैन उपस्थित होते.

SAKAL DATE 25/09/2015